www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–45 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 13 जुलै 2026 ■ किंमत 2 रुपये, पाने –4

**शेतीची शासकीय मोजणी म्हणजे शेतीच्या मालकीची शाश्वती - संजय मोरे पाटील**



पान ४ वर

## वारीत वाटण्यासाठी आणलेल्या शीतपेयामुळे २ परिचारिकांना विषबाधा; अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

धाराशिव : धाराशिवमध्ये शेगावच्या संत गजानन महाराजांच्या वारीदरम्यान मोठी दुर्घटना टळली आहे. भाविकांना वाटण्यासाठी आणलेल्या शीतपेय चे सेवन केल्यानंतर दोन परिचारिका विषबाधाग्रस्त झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना वेळेत उघडकीस आल्याने हजारो वारकऱ्यांवर ओढावणारा संभाव्य धोका टळला.

विषबाधा झालेल्या परिचारिकांची नावे पूजा जाधव आणि पल्लवी सौदागर अशी आहेत. वारीत वाटप (करण्यापूर्वी त्यांनी शीतपेयाची चाचणी म्हणून सेवन केले. त्यानंतर दोघींची प्रकृती अचानक बिघडली. पूजा जाधव यांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर लातूर येथील गॅलेक्सी हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर पल्लवी सौदागर यांच्यावर अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच अन्न व औषध प्रशासन , पोलीस आणि सरकारी रुग्णालयातील कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी वारीत वाटपासाठी आणलेल्या शीतपेयाच्या सर्व बाटल्या जप्त करत पुढील तपास सुरू केला आहे. या तातडीच्या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, संबंधित शीतपेय नेमके कुठून आणण्यात आले होते, ते कोणत्या कंपनीचे होते, त्याचे वाटप कोण करणार होते आणि त्यामध्ये विषारी किंवा दूषित पदार्थ कसा आला, याचा तपास पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन संयुक्तपणे करत आहेत. तपास अहवालानंतरच या प्रकरणामागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## ग्रामीण आवास योजनेचा आढावा; लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा,मोफत वाळू उपलब्ध करून द्या; जिल्हाधिकारी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

ग्रामीण आवास योजनेतील लाभार्थ्यांना हक्काचे घरकुल मिळवून देण्यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणेने गतीने घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्याबरोबरच अतिक्रमण झालेल्या जमिनीवरील घरे नियमानुकूल करणे आणि घरकुल बांधकामासाठी पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचे प्रस्ताव तातडीने जिल्हा प्रशासनाकडे सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी महसूल व ग्रामविकास विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल आणि जिल्हा परिषद प्रशासनाची संयुक्त आढावा बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी.एम, जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागाचे सभापती, बालाजी सोनटक्के, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणाचे वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि नगरपालिका मुख्याधिकारी उपस्थित होते. ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जागेचे प्रस्ताव तातडीने मंजूर करून लाभार्थ्यांची यादी, जागा, आराखडा आणि संबंधित कागदपत्रे जिल्हा ग्रामीण



विकास यंत्रणेमार्फत तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावीत. जेणेकरून घरकुल मंजुरीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करता येईल. शासकीय किंवा गायरान जमिनीवरील लाभार्थ्यांच्या घरांबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करून ती नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव सादर करावेत. वनविभागाच्या अखत्यारितील जमिनींसाठी आवश्यक परवानग्या तातडीने मिळवून प्रक्रिया गतीमान करावी,तसेच याबाबतचे परवानगीचे पत्र वन विभागांनी तात्काळ जिल्हा प्रशासनास सादर करावेत. असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले. घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी पाच ब्रास वाळू मोफत मिळावी, यासाठी लाभार्थ्यांच्या घरापासून जवळ अंतरावर असलेल्या शासकीय वाळू डेपोतून ही वाळू उपलब्ध करून देण्याची कार्यवाही महसूल आणि ग्रामविकास विभागाने समन्वयाने करून येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात. शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या प्रस्तावातील त्रुटी मुख्याधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांनी तत्काळ दूर करून लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करण्यासाठीचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत.याबाबत जिल्ह्यातील आवास योजनांच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी मोहीम स्वरूपात सर्व यंत्रणेने सहभाग घ्यावा असे जिल्हाधिकारी यांनी सुचित केले. जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी, ग्रामीण भागातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांना घरकुल मिळावे यासाठी जिल्हा प्रशासन आणि ग्रामविकास विभागाने परस्पर समन्वयाने काम करून प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी, गोर गरिबांना हक्काचा निवारा देण्यात लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी मिळून काम करण्याचे आश्वासन बैठकीत दिले . जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी.एम. यांनी, जिल्ह्यातील 'नशामुक्त अभियान',बालविवाह मुक्त संभाजीनगर' आणि 'कुपोषणमुक्त बालक' यासाठी पोलीस, उत्पादन शुल्क विभाग महिला बालविकास, महसूल आणि ग्रामविकास विभागाने या महत्त्वाकांक्षी उपक्रमांमध्ये सहभागी होऊन ते यशस्वी करण्यात पुढाकार घ्यावा असे आवाहन यंत्रणेला केले.

## वीज कंपन्यांच्या खाजगीकरणाची भिती कामगारांनी बाळगू नये, कामगारांच्या नोकरीस कोणताही धोका नाही- महामहीम राज्यपाल मा.श्री.हरीभाऊ बागडे

### तांत्रीक कामगारांच्या प्रश्नांवर मंत्रालयात मा.मुख्यमंत्री, उर्जा सचिव, तिनही कंपन्यांचे अध्यक्षांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करणार- अपारंपारीक उर्जामंत्री मा.ना.श्री.अतुल सावे यांचे आश्वासन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य वीज तांत्रीक कामगार संघटना यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील आयसीएआय सभागृह, बीड बायपास येथे संघटनेची राज्यव्यापी परिषद व केंद्रिय कार्यकारिणी सभेचे आयोजन करण्यात आले होते,या परिषद व कें.का.सभेचे उद्घाटन राजस्थान राज्याचे महामहिम राज्यपाल मा.श्री.हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते करण्यात आले तर मुख्य अतिथी म्हणून राज्याचे ओ.बी.सी.विकास व अपारंपारिक उर्जामंत्री मा.ना.श्री.अतुल सावे, शहर मंडळाचे अधिक्षक अभियंता मणिष ठाकरे, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले यांची उपस्थिती होती अशी माहिती संघटनेचे सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

प्रास्ताविकामध्ये सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन यांनी वीज कामगारांना पेन्शनचा प्रश्न प्रलंबीत आहे त्यामुळे सेवा निवृत्तीनंतर कामगारांची हालाखीची स्थिती होत आहे, यास्तव पेन्शन लागू करण्यात यावी, मागील दिवाळीचा सानुग्रह अनुदान देण्यात आला नाही ते सानुग्रह अनुदान देण्यात यावे.महावितरण कंपनीने १३ जिल्हयांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला त्यास संघटनेचा विरोध असून छत्रपती संभाजीनगर शहराचे ३ लाख ५० हजार वीज ग्राहक असून दरमहा २०० कोटींची वसुली आहे, वीज गळती कमी करण्यासाठी संघटनेने प्रस्ताव दिला आहे त्याची अंमलबजावणी झाल्यास वीज गळती कमी होईल आणि वसुली वाढेल यामुळे छत्रपती संभाजीनगरचे खाजगीकरण करण्याची आवश्यकता नाही,आणि विद्युत मंडळाच्या आणि आताच्या कंपनीच्या इतिहासात प्रथमच सुवर्णाक्षरात नोंद होईल असा महामहीम राज्यपाल यांच्या उपस्थितीत संघटनेचा कार्यक्रम



होत पदाधिकारी आणि सभासद हे याचे साक्षीदार झाले असल्याचे अभिमानाने नमुद केले. उद्धाटन पर मार्गदर्शनात महामहीम राज्यपाल म्हणाले की, वीज कामगारांनी कंपन्यांच्या खाजगीकरणाची भिती बाळगू नये, खाजगीकरण होणार नाही आणि कामगारांनी त्यांच्या नोकरीसही धोका नाही, विद्युत मंडळाचे तिन कंपन्या करत असतांना देखील खाजगीकरणाच्या चर्चा झाल्या होत्या परंतू खाजगीरकण झाले नाही फक्त तीन कंपन्या आस्तित्वात आणल्या, कारण कोणत्याही ऑर्गनायझेशनचे काम मोठे असेल तर त्याचे विभाजन केल्यास कामामध्ये सुधारणा होते आणि ग्राहकांना सेवा चांगली मिळते, मी स्वतः राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री यांना लेखी स्वरूपात कळिवल यामुळे कामागारांनी खाजगीकरणाची चिंता करू नये. मुख्य अतिथी मा.ना. श्री.अतुल सावे आपल्या भाषणात म्हणाले की, संघटनेच्या निवेदनातील मागण्या अगदी रास्त असून यावर राज्याचे मुख्यमंत्री तथ उर्जामंत्री, अपर मुख्य सचिव उर्जा, तिनही कंपन्यांचे अध्यक्षांच्या उपस्थितीत मंगळवार कॅबीनेटच्या बैठकीनंतर संघटनेसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात येईल असे आश्वासन दिले. संघटनेच्या केंद्रिय कार्यकरिणी सभेत सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन यांनी खालील ठराव मांडले आणि ते सर्वानुमते पारित करण्यात आले. वीज कामगारांच्या पेन्शन बाबत २००९ मध्ये मा.राज्यपाल यांच्या स्वाक्षरीने पारित झालेला प्रस्ताव विद्युत मंडळाने पेन्शन योजना स्वबळावर राबवावी याची अमंलबजावणी करण्यात यावी व वीज कामगारांना पेन्शन लागू करावी. चालू आर्थिक वर्षात १८०० कोटींची वसुली झाली असून मागील वर्षीचा सानुग्रह अनुदान देण्यात यावा. तांत्रीक कामगारांना स्वेच्छा निवृत्ती योजना लागू करण्यात यावी. महावितरण कंपनीने १३ जिल्ह्यांचे खाजगीरणाचा घेतलेला निर्णय रद्द करावा. कृषी कंपनी आणि त्याचा एम.पी.आर.कसा असेल याची स्पष्टता जाहिर करावी. तांत्रीक कामागारांची ॲनॉमलीसाठी गठीत करण्यात आलेली ॲनॉमली समिती २००८ पासून आहे मात्र त्याची बैठक होत नाही यामुळे ॲनॉमली निकाली निघत नाही यामुळे ॲनॉमली समितीची बैठक घेऊन तांत्रीक कामगारांच्या ॲनॉमली दूर करण्यात यावी. वरील ठराव पारित करण्यात आले आणि यावर निर्णय न झाल्यास आंदोलनाबाबत निर्णय घेण्याचा ठराव पारित करण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप कें.अध्यक्ष भाऊसाहेब भाकरे यांच्या भाषणानंतर झाला. या परिषद व के.का.सभेच्या व्यासपीठावर संघटनचे सल्लागार मंडळ एन.के.मगर, आर.पी.थोरात, श्रावण कोळनूरकर, ताराचंद कोल्हेमामा, केंद्रिय अध्यक्ष भाऊसाहेब भाकरे, सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन, उपाध्यक्ष नाना चट्टे, शिरीष इंगोले, अजिज पठाण, मजहर पठाण, कोषाध्यक्ष भानुदास शेवाळे, उपसरचिटणीस के.वाय.बगड, कैलास गौरकर, शेख मुजीब, शब्बीर पठाण, बी.डी.पाटील, प्रदिप मानकर, विलास कन्नाके, शामकुमार लामदाडे, संघटन सचिव संदिप कव्हठे, आप्पा दाभाडे, संतोष वाघमारे यांची उपस्थिती होती. सुत्र संचालन श्रावण कोळनूरकर आणि रमेश शिंदे यांनी केले आभार प्रदर्शन कें.अध्यक्ष भाऊसाहेब भाकरे यांनी मानले,राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# एसआयआर : मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न

मतदानाचा दिवस उजाडतो. उत्साहाने एक नागरिक मतदान केंद्रावर पोहोचतो. रांगेत उभा राहतो. त्याची वेळ येते. मात्र मतदार यादी तपासल्यानंतर त्याला सांगितले जाते आपले नाव यादीत नाही. काही क्षणांसाठी तो स्तब्ध होतो. मतदानाचा अधिकार असतानाही तो त्या दिवशी तो वापरू शकत नाही. त्या क्षणी त्याला जाणवते की लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार केवळ मतदानाच्या दिवशी मिळत नाही; तो त्याही आधी मतदार यादीत आपल्या नावाच्या अचूक नोंदीपासून सुरू होतो.

ही जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, यासाठी भारत निवडणूक आयोगा मार्फत वेळोवेळी यादी अद्यावत करण्यात येते. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर). ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय उपक्रम नाही; ती प्रत्येक पात्र नागरिकाच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न आहे.

**मतदार यादी म्हणजे लोकशाहीचा पाया**

घराचा मजबूत पाया दिसत नाही, पण संपूर्ण घर त्यावर उभे असते. मतदार यादीचेही तसेच आहे. मतदान केंद्रावरील मतपेटी, निवडणुकीची प्रक्रिया किंवा निकाल यापूर्वी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते. मतदार यादीची अचूकता. मतदार यादी ही केवळ नावांची यादी नसते. ती देशातील प्रत्येक पात्र नागरिकाच्या समान अधिकाराची अधिकृत नोंद असते. या यादीत नाव अचूक असणे म्हणजे मतदानाचा अधिकार सुरक्षित असणे. नाव, पत्ता किंवा इतर माहिती योग्य असल्यामुळे भविष्यातील मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नोंद ही लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरते.

**एसआयआर का आवश्यक आहे?**

दरवर्षी नियमित पुनरीक्षणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये नवीन मतदारांची नोंद, माहितीतील बदल किंवा दुरुस्ती केली जाते. मात्र काही वेळा अधिक व्यापक आणि सखोल पडताळणीची आवश्यकता निर्माण होते. अशा वेळी एसआयआर राबविण्यात येते.

या विशेष पुनरीक्षणाचा उद्देश प्रत्येक पात्र मतदाराची नोंद शक्य तितकी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह ठेवणे हा असतो. कालांतराने स्थलांतर, पत्त्यातील बदल, नव्याने पात्र झालेले मतदार किंवा इतर कारणांमुळे माहितीमध्ये बदल होऊ शकतात. एसआयआर या सर्व बाबींकडे अधिक बारकाईने पाहते. त्यामुळे मतदार यादी अधिक सक्षम, पारदर्शक आणि वास्तवाशी सुसंगत बनते. ही प्रक्रिया भविष्यातील निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अधिक सहज आणि निर्विघ्न व्हावा, यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. या प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) किंवा निवडणूक कर्मचारी नागरिकांच्या भेटी घेतात. अनेकदा ही भेट केवळ कागदपत्रांची पडताळणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती त्यापेक्षा कितीतरी मोठी असते.

घराच्या दाराशी आलेला बीएलओ हा केवळ माहिती नोंदवणारा अधिकारी नसतो; तो प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहावा, यासाठी काम करणारा महत्त्वाचा दुवा असतो. त्याच्या नोंदींमुळे मतदार यादी अधिक अचूक बनते आणि भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक तयारी पूर्ण होते. ही प्रक्रिया नागरिक आणि निवडणूक व्यवस्थापन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करते. कारण लोकशाही मजबूत होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांचा परस्पर संवाद तितकाच आवश्यक असतो. ही प्रक्रिया प्रशासनासाठी नव्हेः प्रत्येक मतदारासाठी आहे

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत समान मूल्य घेऊन येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आवाज त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे मतदार यादीतील स्वतःची माहिती अचूक राहणे म्हणजे आपल्या त्या आवाजाची खात्री करून घेणे होय. एसआयआर ही कोणत्याही एका विभागासाठी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी राबवली जाणारी प्रक्रिया नाही. तिचा सर्वाधिक लाभ नागरिकालाच मिळतो. कारण योग्य आणि अद्ययावत मतदार यादी म्हणजे भविष्यात मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने मतदान करता येण्याची खात्री. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे केवळ एक औपचारिकता पूर्ण करणे नव्हे; तर स्वतःच्या घटनात्मक अधिकाराचे जतन करण्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे होय. लोकशाहीतील आपली उपस्थिती नोंदविण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.

लोकशाही ही केवळ निवडणुकीच्या दिवशी जिवंत होत नाही. ती प्रत्येक वेळी बळकट होते, जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया मनापासून पूर्ण केली जाते. एसआयआर ही अशीच एक विश्वास निर्माण करणारी प्रक्रिया आहे. आज काही मिनिटे देऊन केलेली माहितीची पडताळणी उद्या मतदानाच्या दिवशी निश्चिंतपणे मतदान करण्याचा आत्मविश्वास देते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ नोंदी अद्ययावत करण्यापुरती मर्यादित राहत नाही; ती नागरिक आणि लोकशाही यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा पूल बनते. प्रत्येक मत महत्त्वाचे असते, कारण त्यामागे एका नागरिकाची ओळख, त्याचा अधिकार आणि देशाच्या लोकशाहीवरील विश्वास दडलेला असतो. म्हणूनच एसआयआर ही ङ्ककोणासाठी तरीङ्क नसून आपल्या प्रत्येकासाठी आहे. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे आपल्या मतदानाच्या अधिकाराला अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी निश्चित करण्याचा सकारात्मक निर्णय. आणि म्हणूनच, ही प्रक्रिया माझ्यासाठी आहेः आणि त्यात सहभागी होणे हे माझ्या लोकशाही प्रवासाचे स्वाभाविक पाऊल आहे. महाराष्ट्रात भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत एसआयआर अंतर्गत घरभेटींद्वारे गणना प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या काळात बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घराला भेट देऊन गणना फॉर्म उपलब्ध करून देतात, आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करतात आणि मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी माहिती संकलित करतात. त्यानंतर प्राप्त माहितीची छाननी, दावे व हरकतींची प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अचूक, सुरक्षित आणि निर्विघ्न राहावा, हा आहे.

# जी ट्रम्पुजी : भारताकडे मनुष्यबळ, जगाकडे रोजगार..!

जी ट्रम्पुजी, आमच्याकडे १४० कोटींपेक्षा अधिक लोक आहेत. त्यात कोट्यवधी तरुण आहेत. सक्षम हात आहेत. शिकण्याची तयारी आहे आणि कष्ट करण्याची मानसिकताही आहे. आम्ही त्यांना शिक्षण देतो, पदव्या देतो, प्रमाणपत्रे देतो; पण प्रत्येक हाताला काम देणे मात्र आम्हाला अजून जमलेले नाही. किती दिवस हे वास्तव लपवायचे? म्हणून आता तुमच्याशी आणि जगातील इतर महासत्तांशी थोडे मोकळेपणाने बोलण्याची वेळ आली आहे. तुमच्या अनेक देशांना कामगार हवे आहेत आणि आमच्या तरुणांना काम हवे आहे. मग या दोघांना जोडण्यात नेमकी अडचण काय आहे?

भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. या लोकसंख्येकडे आपण कधी अभिमानाने पाहतो, कधी लोकसंख्या लाभांश म्हणून तिचा गौरव करतो आणि कधी तीच लोकसंख्या विकासातील अडथळा असल्याची चिंता व्यक्त करतो. पण या सर्व चर्चांच्या मध्यभागी असलेला एक साधा प्रश्न आपण पुरेशा स्पष्टपणे विचारत नाहीङ्कएवढ्या मोठ्या लोकसंख्येतील प्रत्येक सक्षम हाताला काम देण्याची आपली क्षमता आहे का?

उत्तर शोधताना भावनिक होऊन चालणार नाही. प्रत्येकाला सरकारी नोकरी देणे अशक्य आहे. प्रत्येकाला उद्योगपती किंवा व्यावसायिक बनवणेही शक्य नाही. शेतीवर आधीच मोठा भार आहे. सेवा क्षेत्र वाढत आहे. तंत्रज्ञान नवनवीन संधी निर्माण करीत आहे. तरीही रोजगार शोधणाऱ्यांची संख्या आणि सन्मानजनक रोजगारनिर्मितीचा वेग यांच्यातील अंतर चिंताजनक आहे. प्रश्न केवळ बेरोजगारीचा नाही; अपुरा रोजगार, कमी वेतन आणि पात्रतेशी विसंगत काम हाही तितकाच गंभीर प्रश्न आहे.

आपली शिक्षणव्यवस्था दरवर्षी लाखो पदवीधर निर्माण करते. हातात पदवी आहे; पण त्या पदवीला रोजगार बाजारात किती किंमत आहे, हा वेगळा प्रश्न आहे. शिक्षणाची पातळी वाढत असताना सुशिक्षित तरुणांमधील बेरोजगारी ही चिंता बनत आहे. आपण तरुणांना जे शिकवतो आणि अर्थव्यवस्थेला ज्या कौशल्यांची गरज आहे, या दोन्हींमध्ये दरी असेल तर केवळ महाविद्यालयांची संख्या वाढवून रोजगाराचा प्रश्न सुटणार नाही. मग भारताने रोजगाराचा विचार फक्त भारताच्या भौगोलिक सीमांमध्येच का करावा?

जी ट्रम्पुजी, तुम्ही ‘अमेरिका फर्स्ट’ म्हणता. प्रत्येक देशाने आपल्या नागरिकांच्या हिताचा विचार करणे स्वाभाविक आहे. आम्हालाही ‘भारत प्रथम’च हवा आहे. पण आजची जागतिक अर्थव्यवस्था इतकी एकमेकांत गुंतली आहे की कोणताही देश सर्व गरजा स्वतःच्या सीमांमध्ये पूर्ण करू शकत नाही. तुम्हाला वस्तू लागतात, कच्चा माल लागतो, तंत्रज्ञान लागते आणि अनेक क्षेत्रांत मनुष्यबळही लागते. आमच्याकडे ते मनुष्यबळ आहे. मग व्यवहाराची भाषा बोलूया.

आज जगात एक विलक्षण विरोधाभास निर्माण होत आहे. भारताकडे प्रचंड मनुष्यबळ आहे. दुसरीकडे अनेक विकसित देशांमध्ये कामगारांची कमतरता जाणवत आहे. काही देशांमध्ये आरोग्यसेवा, वृद्धांची देखभाल, वाहतूक, बांधकाम, उत्पादन, तंत्रज्ञान आणि इतर सेवा क्षेत्रांत आवश्यक मनुष्यबळ मिळत नाही. एका बाजूला काम आहे; पण काम करणारे हात कमी पडत आहेत. दुसऱ्या बाजूला हात आहेत; पण पुरेसे काम नाही.

**मग या दोन टोकांना जोडण्याचा गंभीर प्रयत्न का होऊ नये?**

अर्थशास्त्र आपल्याला सांगते की, ज्या देशाकडे एखादा उत्पादनघटक तुलनेने मुबलक आहे, त्या उपलब्धतेचा परिणामकारक उपयोग केल्यास त्या देशाला आर्थिक लाभ मिळू शकतो. भारताकडे खनिज तेलाचे प्रचंड साठे नाहीत. प्रत्येक अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आपली मक्तेदारी नाही. प्रचंड भांडवलसाठ्याच्या बाबतीतही आपण जगात प्रथम नाही. पण आपल्याकडे मनुष्यबळ आहे. तरुण हात आहेत. शिकण्याची तयारी असलेली माणसे आहेत. श्रम करण्याची क्षमता आहे. मग भारतीय मनुष्यबळाकडे आपण जागतिक आर्थिक उत्पादनघटक म्हणून का पाहू नये?

याचा अर्थ भारतीय तरुणांनी देश सोडून पळून जावे, असा अजिबात नाही. भारताने देशांतर्गत रोजगारनिर्मितीचे सर्व प्रयत्न अधिक वेगाने केलेच पाहिजेत. उद्योग वाढले पाहिजेत. उत्पादन वाढले पाहिजे. शेतीपूरक व्यवसाय निर्माण झाले पाहिजेत. पर्यटन, आरोग्य, शिक्षण, बांधकाम आणि सेवा क्षेत्रातील संधी विस्तारल्या पाहिजेत. रोजगार देणे ही सरकारची जबाबदारी नाही, असे म्हणून कोणत्याही सरकारला हात झटकता येणार नाही.

पण दुसरे वास्तवही स्वीकारले पाहिजे. १४० कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या देशातील प्रत्येक सक्षम हाताला देशाच्या सीमांच्या आतच पुरेसा आणि सन्मानजनक रोजगार देता येईल का? शक्य असेल तर जरूर द्या. आम्हाला त्यापेक्षा अधिक आनंद कशाचा असेल? पण ते शक्य होत नसेल, तर रोजगाराचा विचार जगाच्या बाजारपेठेशी जोडण्याची हिंमत दाखवा.

आपण वस्तूंच्या जागतिक व्यापाराचे समर्थन करतो. भांडवल एका देशातून दुसऱ्या देशात जाते. तंत्रज्ञान काही क्षणांत सीमा ओलांडते. बहुराष्ट्रीय कंपन्या जगभर व्यवसाय करतात. एका देशातील गुंतवणूक दुसऱ्या देशात रोजगार निर्माण करते. मग मनुष्यबळाच्या सन्मानजनक आणि सुरक्षित हालचालीसमोर एवढ्या भिंती का?

‘विश्वचि माझे घर’ असे आपण अभिमानाने म्हणतो. ही केवळ संतवाणी म्हणून उच्चारायची ओळ आहे का? तिचा आर्थिक अर्थही समजून घेण्याची वेळ आली आहे. एखादा तरुण भारतात जन्माला आला आणि त्याच्या कौशल्याला भारतात काम उपलब्ध नाही; पण अमेरिका, जर्मनी, जपान, दक्षिण कोरिया किंवा जगातील अन्य एखाद्या देशात त्याच कौशल्याच्या व्यक्तीची गरज आहे, तर जन्माचे भौगोलिक ठिकाण त्याच्या रोजगाराची अंतिम मर्यादा का ठरावी?

जी ट्रम्पुजी, आम्ही तुमच्याकडे शरण येत नाही. आम्ही भीकही मागत नाही. आमचे हात काम करण्यासाठी पुढे करीत आहोत. तुम्हाला ज्या कौशल्याचे मनुष्यबळ हवे आहे, ते सांगा. आम्ही आमच्या तरुणांना प्रशिक्षित करू. भाषा शिकवू. तंत्रज्ञान शिकवू. तुमचे कामाचे नियम शिकवू. तुमच्या देशातील कायदे आणि कार्यसंस्कृती समजावून सांगू. पण त्यांच्यासाठी कायदेशीर आणि सन्मानजनक रोजगाराचे दरवाजे उघडा. भारताने आता ‘देशनिहाय रोजगार आणि कौशल्य धोरण’ तयार केले पाहिजे. जगातील कोणत्या देशाला पुढील पाच, दहा किंवा पंधरा वर्षांत कोणत्या प्रकारचे मनुष्यबळ लागणार आहे, याचा सातत्याने अभ्यास करणारी स्वतंत्र सक्षम यंत्रणा असली पाहिजे. कोणत्या देशाला परिचारिका हव्या आहेत? कुठे रुग्ण आणि वृद्धांची काळजी घेणारे कर्मचारी आवश्यक आहेत? कुठे वाहनचालक, तंत्रज्ञ, वेल्डर, बांधकाम कामगार, इलेक्ट्रिशियन, अभियंते किंवा माहिती तंत्रज्ञानातील तज्ज्ञांची कमतरता आहे? ही माहिती भारतातील शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण व्यवस्थेपर्यंत पोहोचली पाहिजे.

ज्या देशाला जसे मनुष्यबळ हवे, तसे प्रशिक्षित मनुष्यबळ भारताने तयार केले पाहिजे.

जर्मनीला कामगार हवे असतील, तर जर्मन भाषेसह आवश्यक तांत्रिक कौशल्य भारतात शिकवा. जपानला मनुष्यबळ हवे असेल, तर जपानी भाषा, तेथील कामाची शिस्त आणि आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण द्या. आरोग्य क्षेत्रात जागतिक मागणी असेल, तर संबंधित देशांच्या मानकांनुसार परिचारिका आणि आरोग्यसेवा कर्मचारी तयार करा.

जगाला चालक हवे असतील, तर आंतरराष्ट्रीय वाहतूक नियम आणि आवश्यक भाषा शिकवून चालक तयार करा. पदवी देऊन तरुणांना रोजगाराच्या रांगेत उभे करण्यापेक्षा जगाला आवश्यक असलेले कौशल्य त्यांच्या हातात देणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

यासाठी जगाच्या पातळीवर ‘जागतिक रोजगार विनिमय’ उभा करण्याचा विचार भारताने मांडला पाहिजे. जगातील कोणत्या देशात कोणते काम उपलब्ध आहे आणि कोणत्या देशात कोणत्या कौशल्याचे सक्षम हात उपलब्ध आहेत, यांची विश्वासार्ह नोंदणी असावी. कौशल्याची आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रे, सुरक्षित स्थलांतर, न्याय्य वेतन, विमा, कायदेशीर संरक्षण आणि कामगारांच्या सन्मानाची हमी या व्यवस्थेचा भाग असली पाहिजे.

आणखी एक पाऊल पुढे जाऊया. ‘जागतिक रोजगार हमी’ या संकल्पनेवर चर्चा सुरू करण्यास काय हरकत आहे?

भारताच्या रोजगार हमी योजनेची तंतोतंत नक्कल जगभर करावी, असा याचा अर्थ नाही. प्रश्न एका व्यापक तत्त्वाचा आहेङ्कजगातील कोणताही सक्षम हात केवळ रोजगाराची माहिती नाही, योग्य प्रशिक्षण नाही किंवा दोन देशांमध्ये समन्वयाची यंत्रणा नाही म्हणून रिकामा राहू नये. जागतिक अर्थव्यवस्था जर वस्तू, सेवा, भांडवल आणि तंत्रज्ञानासाठी व्यवस्था निर्माण करू शकते, तर मानवी श्रमशक्ती आणि उपलब्ध काम यांना जोडण्यासाठी सक्षम जागतिक व्यवस्था का निर्माण करू शकत नाही?

आणि हो जी ट्रम्पुजी, त्या योजनेला तुमचे नाव द्यायचे असेल तर द्या. मोदीजींचे नाव द्या. रामजींचे नाव द्या. आणखी कोणाचे नाव द्यायचे असेल तर तेही द्या. नावावरून वाद घालण्यासाठी आमच्याकडे आधीच भरपूर वेळ आहे. आम्हाला नावाशी देणेघेणे नाही. आमच्या सक्षम हाताला काम द्या!

कारण रिकामा हात ही केवळ आर्थिक समस्या नसते. दीर्घकाळ काम न मिळालेला तरुण निराश होतो. त्याची ऊर्जा दिशाहीन होऊ शकते. समाजमाध्यमांवर दिवसभर कोणाला तरी शिव्या देणे, ट्रोल करणे, अफवा पुढे पाठवणे, जात-धर्माच्या वादात अडकणे आणि काल्पनिक शत्रू शोधणे यात किती मानवी ऊर्जा वाया जात आहे, याचाही विचार केला पाहिजे. प्रत्येक ट्रोल बेरोजगार आहे, असा सरसकट निष्कर्ष काढता येणार नाही; पण अर्थपूर्ण कामाचा अभाव आणि दिशाहीन सामाजिक ऊर्जा यांच्यातील संबंध पूर्णपणे दुर्लक्षितही करता येणार नाही. काम माणसाला केवळ पैसा देत नाही. काम त्याला ओळख देते, आत्मसन्मान देते, दिनक्रम देते आणि आपण समाजासाठी उपयोगी आहोत, ही भावना देते. त्यामुळे रोजगार हा केवळ अर्थमंत्रालयाचा विषय नाही. तो सामाजिक शांतता, मानवी प्रतिष्ठा आणि देशाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. भारताने जगातील महासत्तांसमोर आता केवळ गुंतवणूक मागणारा देश म्हणून उभे राहू नये. भारताने ठामपणे सांगितले पाहिजेङ्कआमच्याकडे सक्षम मनुष्यबळ आहे. आम्ही त्याला तुमच्या गरजेनुसार प्रशिक्षित करू. तुम्ही सन्मानजनक रोजगाराच्या संधी खुल्या करा. सुरक्षित आणि कायदेशीर स्थलांतराची व्यवस्था निर्माण करा. श्रमाचे शोषण होणार नाही, याची हमी द्या. जी ट्रम्पुजी, तुमच्याकडे काम असेल तर सांगा. जर्मनीकडे काम असेल तर त्यांनी सांगावे. जपानने सांगावे.

जगातील कोणत्याही देशाने सांगावे. भारताने आपल्या तरुणांना त्या कामासाठी तयार करावे. आमच्या तरुणांनीही हे समजून घेतले पाहिजे की केवळ पदवी घेऊन सरकारी नोकरीची वाट पाहणे हा एकमेव रोजगारमार्ग राहिलेला नाही. जग मोठे आहे. कामाच्या गरजा मोठ्या आहेत आणि स्पर्धाही मोठी आहे.

भारतामध्ये काम मिळाले तर उत्तमच. ते निर्माण करणे ही आपल्या सरकारची पहिली जबाबदारी आहे. पण प्रत्येक सक्षम हाताला देशातच काम देणे शक्य होत नसेल, तर वास्तव स्वीकारण्याची हिंमतही आपल्यात असली पाहिजे. जगासमोर हात पसरण्यासाठी नव्हे, तर काम करण्यासाठी हात पुढे करण्याची वेळ आली आहे. जी ट्रम्पुजी, भारताकडे मनुष्यबळ आहे. जगाकडे रोजगार आहे. मध्ये फक्त व्यवस्था उभी करण्याची गरज आहे. ‘विश्वचि माझे घर’ असे म्हणणाऱ्या भारताचा एकच प्रश्न आहेङ्कतुमच्याकडे काम आहे आणि आमच्याकडे काम करणारे हात आहेत; मग आम्हाला काम देणार कधी?

**– डॉ. भारत कऱ्हाड,**
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली,
जिल्हा रत्नागिरी.

# तांडा वाड्यातील अनेकांच्या स्वप्नांना शिक्षणाचे पंख देणारे प्राचार्य राठोड सदैव स्मरणात राहतील- मंत्री संजय राठोड

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

येथील वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य राजाराम राठोड (वय ९०) यांच्या पार्थिवावर आज महाविद्यालयाच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे गुरुवारी (दि.९) दुपारी निधन झाले होते. शासनाच्या वतीने मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. तांडा वाड्यातील अनेकांच्या स्वप्नांना शिक्षणाचे पंख देणारे प्राचार्य राठोड सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दात मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी त्यांना श्रद्धांजली वाहीली.



अंत्यसंस्कार समयी खा. डॉ. कल्याण काळे, माजी खा. इम्तियाज जलील, आ.राजेश राठोड, माजी मंत्री राजेंद्र दर्डा, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, प्राचार्य संजीव रेड्डी, गौरसेना अध्यक्ष संजय चव्हाण, बंजारा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष बापुराव राठोड, बापू घडमोडे, प्रा. सुसिंग जाधव, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, वसंतराव नाईक महाविद्यालय, बळीराम पाटील विद्यालय येथील शिक्षक, कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंत्री संजय राठोड यांनी श्रद्धांजलीपर शोकाकूल समुदायासमोर आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले की, काही माणसं आयुष्य जगत नाहीत, तर हजारो आयुष्यांना जगण्याचा अर्थ देतात. काही व्यक्ती स्वतः साठी इतिहास घडवत नाहीत, तर समाजाच्या भवितव्याचा इतिहास घडवतात. अशीच एक तेजस्वी ज्ञानज्योत आज अनंतात विलीन झाली.प्राचार्य राजारामजी राठोड यांनी वंचित, शोषित, भटक्या-विमुक्त, तांडा-वाडीतील असंख्य मुलांच्या डोळ्यांतील स्वप्नांना त्यांनी शिक्षणाची पंखे दिली. अनेकांच्या हातात पुस्तक दिले, अनेकांच्या मनात आत्मविश्वास जागवला आणि अनेक कुटुंबांच्या भविष्याला उज्ज्वल दिशा दिली.

वसंतरावजी नाईक यांनी समाजातील उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे जे स्वप्न पाहिले, त्या स्वप्नाचे आयुष्यभर निष्ठेने संवर्धन करणाऱ्या थोर शिलेदारांमध्ये प्राचार्य राजाराम जी राठोड यांचे स्थान अग्रक्रमाचे राहील. त्यांनी त्यांनी केवळ महाविद्यालय उभे केले नाही, तर माणसे घडवली; पदवीधर नव्हे तर जबाबदार नागरिक घडवले. वाड्या, वस्त्या, तांडे आणि झोपडपट्ट्यांतील गरीब, गरजू, वंचित मुलांना त्यांनी शिक्षणाचा अधिकार दिला. हजारो विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या प्रेरणेचा, त्यागाचा आणि मायेचा हात कायम राहिला.

प्राचार्य राठोड यांच्या पश्चात मुलगे ॲड. अभय राठोड, नितीन राठोड, डॉ. बिपीन राठोड, जावई डॉ. अशोक चव्हाण, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्राचार्य राठोड यांनी १९६० ते जून १९६९ दरम्यान उदगीर तालुक्यातील विद्यानिधी हायस्कूल येथे मुख्याध्यापक म्हणून काम केले. १९६६ ते १९७२ दरम्यान उदगीरच्या शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे संघटन सचिव, १९७२ ते १९९७ या कालावधीत वसंतराव नाईक महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले. १९६० मध्ये मराठवाड्यात वसतिगृह सुविधा सुरू केली. १९७२ मध्ये वसंतराव नाईक महाविद्यालयाची, तर १९८३ मध्ये बळीराम पाटील प्राथमिक शाळेची स्थापना केली. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या उपेक्षित भटक्या आणि विमुक्त समाजासाठी त्यांनी भरीव काम केले. अखिल भारतीय बंजारा सेवा संघाचे सचिव म्हणून त्यांनी भरीव काम केले.

# मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कामकाज वेळेत पूर्ण करा -जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण करण्यासाठी वैजापूर विधानसभा मतदारसंघात सुरू असलेले घरोघरी सर्वेक्षण मोहिमेचे कामकाज वेळेत पूर्ण करा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारीविनय गौडा जी. सी. यांनीवैजापूर येथे काल (दि. १०)दिले.

या दौऱ्यात त्यांनी तालुक्यातील शिवूर आणि सफीयाबाद वाडी येथील मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इङज) तसेच पर्यवेक्षकांच्या कामकाजाची पाहणी केली. त्यानंतर पंचायत समिती वैजापूर येथे आढावा बैठक घेण्यात आली. ही माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांनी दिली.

बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी मतदार यादी पुनरीक्षणाचे काम अत्यंत महत्त्वाचे असून ते राष्ट्रीय कर्तव्य असल्याचे सांगितले. मतदारसंघातील प्रत्येक यादीभागाचे काम विहित मुदतीत आणि अत्यंत अचूकपणे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. कामात कोणतीही दिरंगाई किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

उत्कृष्ट काम करणाऱ्या बी एल ओ चा १५ ऑगस्टला सन्मान - मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे (इङज) घरोघरी सर्वेक्षण आणि एऋ फॉर्मचे काम शंभर टक्के पूर्ण होईल, अशा उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी रोजी प्रशस्तीपत्र देऊन जाहीर सत्कार करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी गौडा यांनी जाहीर केले.

**टाळाटाळ करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा** - दुसरीकडे, निवडणूक कामात निष्काळजीपणा करणाऱ्या किंवा वरिष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला. शासकीय कर्मचारी यांनी कामात टाळाटाळ केली, विनाकारण अनुपस्थित राहिले किंवा आदेशाचे पालन केले नाही, तर लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३२(१) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' माहितीपटाचा प्रीमियर



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनी संयुक्तपणे निर्मित 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा आयनॉक्स चित्रपटगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रीमियर शो झाला. या 'प्रीमियर शो'साठी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे, आदी उपस्थित होते. हा माहितीपट पंढरपूर वारीची प्रत्यक्ष अनुभूती देतो. या चित्रपटागृहामध्ये जणू काही पंढरपूरची वारी प्रत्यक्षात उतरली असल्याचेही अनुभव येत असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

**थोडक्यात माहितीपट** - 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा २२ मिनिटांचा माहितीपट वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. या माहितीपटाचे मराठी, इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलगु, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे. विविध भाषांमधील या माहितीपटाचे प्रसारण डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स, डिस्कव्हरी टर्बो अशा ९ वाहिन्यांवरुन करण्यात येत आहे.

# पाणी पुरवठा योजनेतील तांत्रिक चुका दुर केल्याशिवाय पाणी वेळेवर मिळण्याचे स्वप्न दूरच -राजेंद्र दाते पाटील

## मराठवाडा पाणी परिषदेतर्फे शहराच्या पाणी प्रश्नावर जलमंथन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पाणी पुरवठा योजनेतील तांत्रिक दुरुस्त्या दुर केल्याशिवाय संभाजीनगर वासीयांचे पाणी वेळेवर मिळण्याचे स्वप्न दूरच आहे असे प्रतिपादन शहराच्या पाणी समस्या बाबत अगदी पहिली वाहिली जनहीत याचीकाकर्ते आणि जेष्ठ जल अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मराठवाडा पाणी परिषदेतर्फे ग्राम विकास भवन एन २ सिडको येथे आयोजित 'जलमंथन' उपक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ' छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजना व सद्यस्थिती ' या विषयावर बोलत होते .




आपल्या बीज भाषणात पुढे बोलतांना जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरकर अनेक वर्षा पासून वेळेवर व दररोज पिण्याच्या पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत परंतुवस्तुस्थिती वेगळी आहे .प्रस्तावित ५६ पाण्याच्या टाक्या बांधकाम अद्याप अपूर्ण आहेत. २५०० मी.मी व्यासाची जल वाहिनी अपूर्ण असुन ९०० मी.मी. व्यासाची स्टॉप गॅप अरेंजमेंट असलेली जलवाहिनी -मुख्य जलवाहिनीची हायड्रोलिक टेस्टिंग करणे अत्यावश्यक असुन शहरातील सामान्य ग्राहकांच्या पर्यंत मोठ्या प्रमाणात जलवाहिनीचे काम बाकी आहे.शहराची गरज साधारणतः ३७५ ते ४०० द.घ.ली. पाण्याची असताना सद्य स्थितीत फक्त १५० ते १७० द.घ.ली पाणी उपलब्ध होत असुन या योजनेची सविस्तर तांत्रिक माहिती जलमंथन परिषदेत पहिल्यांदाच अंत्यन्त अभ्यासु पद्धतीने आपल्या मुख्य बीज भाषणात डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी विषद करतांना नमुद केले की,पाणी साठवणूक क्षमता आणि ग्राहकांपर्यंत पाईप लाईन अंथरलेली नसल्यामुळे पाणी वाढवून सुद्धा परिणामी नागरिकांना आठ दिवसाला एकदा ते ही अनियमित वेळेत पाणी पुरवठा होतो आहे.अशा परिस्थितीत दररोज वेळेवर व पुरेसे पाणी मिळेल हे दिवा स्वप्नच असल्याचे नमुद त्यांनी केले.याप्रसंगी डॉ. जयसिंग हिरे यांनी सुद्धा महत्त्व पूर्ण सूचना चर्चा होतांना मांडल्या. शहराची पाणीपुरवठा योजना वेळेत पूर्ण करून छत्रपती संभाजीनगर शहरवासीयांना लवकरात लवकर पाणी उपलब्ध करून द्यावे याकरिता लवकरच जलमंथन ग्रुप तर्फे महापालिका आयुक्तांना याबाबतचे निवेदन देण्याचे ठरले.

प्रसंगी परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे,माजी अधीक्षक अभियंता डॉ. जयसिंग हिरे, दादासाहेब शिंदे, जलधोरण विषयाचे नियोजक रामचंद्र पिल्दे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविकात परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे यांनी आशिया खंडात वेगाने वाढणाऱ्या व औद्योगिकक्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या ऐतिहासिक शहर छत्रपती संभाजीनगरवासी यांना वेळेवर व दररोज पाणीपुरवठा होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. यासाठी समाजातील बुद्धीवादी,जल अभ्यासक व जागरूक नागरिकांनी पाणी प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे याबाबत माहिती दिली. जलमंथन परिषदेत मराठवाड्यातील जल प्रश्नांचा अभ्यास, वैज्ञानिक दृष्टि कोनातून उपाययोजना आणि लोकसह भागातून जल धोरणावर विधायक चर्चा घडवून आणण्यात येते. याप्रसंगी विद्यापीठातील जी.एम. एन.आय.आर. डी चे डॉ.राहुल महामुनी, जयप्रकाश बागडे, शिवाजी घुगे, सतीश वानखेडे, भारती खरटमल, अशोक कोळी यांचे सह जलक्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या जलमंथन परिषदेचा कार्यक्रम यशस्वी करण्या करिता अर्चना पवार ,निवृत्ती घोडके ,योगिता शिंदे यांनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य; जैन टॅग ग्रुपचा मोफत जादू प्रयोग उपक्रम गाजला



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

नवजीवन स्कूल व पी. यू. जैन स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आगळावेगळा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्व जपत जैन ग्रुप तर्फे नवजीवन स्कूल व पी. यू. जैन स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत जादू प्रयोग आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शाळा प्रशासनाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धपणे कार्यक्रमाचा आनंद घेतला आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व उत्साहाने संपूर्ण वातावरण भारावून गेले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जैन टॅग ग्रुपच्या अध्यक्षा जयश्री लोहाडे यांच्या नेतृत्वाखाली प्रोजेक्ट कमिटी, रचना पहाडेकीर्ती पाटनी मिताली काला सारीका बडजाते दिपाली पाडे सपना पाटनी कोअर कमिटी अणुपमा दगडा दिपीका बडजाते आणि ग्रुपच्या सर्व २५ सदस्यांनी मोलाचे योगदान दिले. जैन टॅग ग्रुपतर्फे दोन्ही शाळांचे संस्थापक, विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांचे मनः पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# शेतीची शासकीय मोजणी म्हणजे शेतीच्या मालकीची शाश्वती - संजय मोरे पाटील

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



'शेतीची शासकीय मोजणी म्हणजे शेतीच्या मालकीची शाश्वती' असते असे मत ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी व्यक्त केले. नळिवहिरा, ता. जाफराबाद (जि. जालना) येथे गुरुवार (दि. ९ जुलै ) रोजी झालेल्या ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या नियमित मासिक चर्चासत्र कार्यक्रमात मोरे पाटील बोलत होते.

शेतकऱ्यांना शासकीय जमीन मोजणीचे महत्त्व पटवून देतांना ते म्हणाले की, शेतजमिनीची अधिकृत शासकीय मोजणी ही केवळ सीमारेषा निश्चित करण्याची प्रक्रिया नसून ती शेतकऱ्यांच्या मालकी हक्काला कायदेशीर बळ देणारी महत्त्वाची बाब आहे. अनेक ठिकाणी सीमावाद, अतिक्रमण, वारसाहक्काचे वाद, खरेदी-विक्रीतील अडचणी आणि न्यायालयीन प्रकरणे केवळ अचूक मोजणी नसल्याम ुळे निर्माण होतात. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने वेळेत आपल्या जमिनीची शासकीय मोजणी करून घेणे आवश्यक आहे.

मोरे पाटील यांनी पुढे सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानामुळे आज शासकीय मोजणी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने केली जाते. जमिनीची नोंद, सातबारा, फेरफार, बँक कर्ज, सिंचन योजना, पीक विमा तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेताना अधिकृत म ोजणी अत्यंत उपयुक्त ठरते. भविष्यात आपल्या वारसांना कोणताही वाद न होता जमीन हस्तांतरित व्हावी, यासाठी शासकीय मोजणी ही काळाची गरज आहे. यावेळी त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आवाहन केले की, 'शेताची शासकीय मोजणी हा खर्च नसून आपल्या पिढ्यानपिढ्यांच्या म ालकी हक्काचे संरक्षण करणारी सुरक्षित गुंतवणूक आहे. प्रत्येक शेतकऱ्याने शासकीय मोजणी करून आपल्या मालकीची शाश्वती निश्चित केली पाहिजे.' या मार्गदर्शनपर विषयास उपस्थित शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी विठ्ठल खपुटे, अनिल जाधव, विष्णू जाधव, संपत जंजाळ, नारायण मेमटे, शिवाजी मोरे, गजानन मेमटे, राजेंद्र मेमटे, किशोर जंजाळ, शरद पाचरणे, भगवान खपुटे, डीगांबर खपुटे, विनोद मोरे, राजु म्हस्के, शंकर म्हस्के, विष्णू म्हस्के, मोबीन शेख, सलीम शेख सह अन्य उपस्थित होते.

# युथिका आयोजित छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा महोत्सव २०२६ आयोजन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

युथिका ही २०० हून अधिक सदस्यांची युवा-नेतृत्वाखाली कार्यरत असलेली स्वयंसेवी संस्था असून, गेल्या पाच वर्षांपासून एड्सग्रस्त बालकांची काळजी, महिला सक्षमीकरण प्रकल्प, मासिक पाळी स्वच्छता जनजागृती व साहित्य वितरण तसेच दर सोमवारी गोशाळांना भेट देऊन ५५० हून अधिक गायींसाठी चाऱ्याची व्यवस्था अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजसेवा करत आहे. संस्थेच्या संस्थापक सय्योमिता नहार यांच्या नेतृत्वाखाली युथिकाने समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

स्वयंभू संस्था म्हणून युथिका आपल्या सामाजिक उपक्रमांसाठी आवश्यक निधी स्वतः उभारते. त्यासाठी संस्था मॉडेल युनायटेड नेशन्स (MUN) तसेच छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा महोत्सव २०२६ यांसारख्या निधी संकलन उपक्रमांचे आयोजन करते. यंदाच्या क्रीडा हा १८ व १९ जुलै रोजी ईनफ्युटौ टर्फ बीड बायपास महोत्सवामध्ये क्रिकेट, फुटबॉल आणि पिकलबॉल या स्पर्धांचा समावेश आहे.

यंदाच्या महोत्सवाचे टायटल स्पॉन्सर रेडफिट जिम असून त्याच्या संचालिका सौ. पौर्णिमा राजपूत यांच्या सहकार्यामुळे युवकांचा विकास, तंदुरुस्ती आणि सामाजिक बांधिलकीला मोठे बळ मिळत आहे. तसेच को-टायटल स्पॉन्सर जबिंदा बिल्टस्पेसचे संचालक श्री. गुणवंत सिंह जबिंदा यांनीही या उपक्रमाला मोलाचे सहकार्य देत सामाजिक कार्याला प्रोत्साहन दिले आहे.

यंदाच्या महोत्सवाचे शिक्षण प्रायोजक स्टेपिंग स्टोन्स हायस्कूल असून, श्री. झईम रहीम यांनी या उपक्रमाच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले आहे.

क्रिकेट स्पर्धेत श्री. उदय फेपाळे (MOP Dominators), श्री. प्रज्वल भगत (Lumen), सौ. पौर्णिमा राजपूत (Redfit), श्री. सलमान सुरी (SK Infra), श्री. अबुबकर पटेल (Patel Strikers), श्री. अंशुमन देसाई, श्री. आयुष इसरानी, श्री. विक्रांत राजपूत (Terra), श्री. तरंग तोतला (Sledgers United) आणि श्री. सुमित सोनी (Ather) यांच्या मालकीचे संघ सहभागी होणार आहेत.

या निधी संकलन उपक्रमाद्वारे युथिका क्रीडेच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत सामाजिक उपक्रमांना अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न करत आहे.

## 'युथिका'संस्थेच्या माध्यमातून गरजूंची मदत करणे हीच खरी समाजसेवा - संयमिता नहार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

समाजातील गरजू, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे हीच खरी समाजसेवा असून, प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन युथिका सेल्फ सस्टेन्ड संस्थेच्या सय्योमिता नहार यांनी केले.

त्या संस्थेतर्फे आयोजित सामाजिक उपक्रम दरम्यान बोलत होत्या. यावेळी विविध समाजोपयोगी उपक्रमांद्वारे गरजू नागरिकांना मदत करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, महिला सक्षम ीकरण तसेच गरजू कुटुंबांना आवश्यक वस्तूंचे वाटप अशा विविध उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. संयमिता नहार म्हणाल्या, 'समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने आपल्या क्षमतेनुसार गरजूंना मदतीचा हात दिल्यास अनेकांचे जीवनमान उंचावू शकते. सामाजिक कार्यातून मिळणारे समाधान हे कोणत्याही संपत्तीपेक्षा मोठे असते. यावेळी उपस्थितांनी संस्थेच्या समाजहिताच्या कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांमध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्नड येथे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.यांनी घेतला मतदार यादी विशेष सखोल पुनःरीक्षण कामाचा आढावा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज कन्नड तालुक्यातील मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनःरीक्षण (एस आय आर) कामाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच एस आय आर चे शंभर टक्के कार्य पूर्ण करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी एल ओ)यांचा सत्काराही त्यांनी केला.

उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार श्रीमती सारिका भगत तसेच इतर तालुका स्तरीय अधिकारी यांची यावेळी उपस्थिती होती. एस आय आर चे १०० टक्के काम पूर्ण करणारे मतदान केंद्र क्रमांक १८४,३२५,२७९ येथील बी एल ओ यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी गौडा यांनी कन्नड तालुक्यातील अंधानेर येथील जिल्हा परिषद शाळेस भेट देऊन एस आय आर कामाचा आढावा घेतला. तसेच वृक्षारोपण केले सोबतच येथे असणाऱ्या घनदाट वन येथे ही भेट दिली. मुंडवाडी येथे असणाऱ्या आदर्श शेतकरी तेजराव बारगळ संचलित अंकुर रोपवाटिकेसही त्यांनी भेट दिली. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना संजय गांधी निराधार योजनेचे मंजुरी पत्र त्यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199